दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३१ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.९ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी– शरदचंद्र पवार

## शरद पवार यांच्या पक्षाला मिळाले नवीन नाव

**मुंबई–राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने बुधवारी निवडणूक आयोगाला पक्षासाठी ३ नावांचा प्रस्ताव पाठवला होता. यात अनुक्रमे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी एस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार व 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार' या ३ नावांचा समावेश होता. तर निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या पक्षाला आता 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी– शरदचंद्र पवार' असे नवीन नाव दिले आहे. निवडणूक आयोगाने यासंदर्भात नुकताच निर्णय दिला आहे.दरम्यान, राज्यसभा निवडणूकीपर्यंत म्हणजे २७ फेब्रुवारी पर्यंत शरद पवार यांच्या पक्षाला हे नाव देण्यात आले आहे. त्यानंतर शरद पवार गटाला पुन्हा निवडणूक आयोगाकडे नावासाठी अर्ज करावा लागणार असल्याचे सांगण्यात येत आहे.तर निवडणूक आयोगाने आज केवळ पक्षाच्या नावासंदर्भात निर्णय घेतला आहे. तर राज्यसभेच्या निवडणुकीसाठी पक्षाला चिन्हाची गरज भासत नाही. त्यामुळे पक्षचिन्हाचा निर्णय आगामी काळात घेतला जाणार आहे.**

दरम्यान, शरद पवार यांच्या गटाच्या वतीने पक्ष चिन्हासाठी तीन नाव देण्यात आले आहे. त्यात वटवृक्ष, उगवता सूर्य आणि कपबशी या नावांचा समावेश आहे. काही सुत्रांकडून सांगण्यात आले की, या तीन नावांपैकी वटवृक्ष नावाची चर्चा सर्वाधिक आहे. निवडणूक आयोगाकडून वटवृक्ष चिन्ह देण्याची शक्यता वर्तविली जात आहे.निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला बुधवारी सायंकाळी ४ वाजेपर्यंत ३ नावे पाठवण्याची मुदत दिली होती. या ठराविक मुदतीत या गटाला नावे पाठवण्यात अपयश आले असते तर या गटाच्या नेत्यांवर अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची वेळ आली असती.निवडणूक आयोगाने ६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीच्या सत्ताधारी अजित पवार गटाला खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता दिली होती. तसेच या गटाला घड्याळ हे राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्हही दिले होते. आयोगाने या प्रकरणी तब्बल ६ महिन्यांत १० सुनावणी घेतल्या. त्यानंतर आपला निर्णय दिला. आमदारांच्या संख्याबळाच्या आधारावर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली.राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) वकील अभिकल्प प्रताप सिंह यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. त्यामुळे आता भविष्यात शरद पवार गटाने या प्रकरणी एखादी याचिका दाखल केली, तर कोर्टाला आपला एकतर्फी निर्णय देता येणार नाही. यासंबंधी कोर्टाला अजित पवार गटाचेही म्हणणे ऐकूण घ्यावे लागेल.दुसरीकडे, अजित पवार यांनी निवडणूक आयोगाचा निर्णय नम्रपणे स्वीकारत असल्याचे म्हटले आहे. कोणत्याही पक्षाच्या संदर्भात घडामोडी घडल्यानंतर न्याय मागण्याची पद्धत आहे. त्यानुसार आम्ही निवडणूक आयोगाकडे गेलो होतो. आमचे म्हणणे मांडले, इतरांनीही त्यांचे म्हणणे मांडले. लोकशाहीमध्ये बहुमताला प्राधान्य असते, त्यानुसार आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, पक्षाचे चिन्ह घड्याळ व झेंडा आम्हाला मिळाला. आमच्या सोबतच्या ५० आमदारांनी घेतलेल्या निर्णयाला निवडणूक आयोगाने मान्यता दिली. विधासभेत अध्यक्षांसमोरही सुनावणी झाली आहे. ते कधी निकाल देतील ते माहिती नाही. ते लवकरात लवकर निकाल देतील अशी अपेक्षा आहे, असे अजित पवार म्हणाले.पक्ष पळवल्याचा आरोप विरोधक करत आहेत, असा प्रश्न केला असता अजित पवार म्हणाले, पक्ष पळवण्याचा प्रश्नच कुठे येतो? कोण काय बोलतो, त्याचा आम्ही विचार करत नाही. मी कुणाच्याही आरोपाला उत्तर द्यायला बांधील नाही. आयोगाने आमची बाजू खरी मानली. त्यांच्या बाजूने निकाल गेला असता तर कोर्टात गेलो असतो. आम्ही राज्याची कामे करण्यासाठी इथे आलो आहोत. नवीन पिढीला बरोबर घेऊन राज्यासाठी कामे करत राहू, असेही अजित पवार म्हणाले.पक्षाचे नाव व चिन्ह परत मिळवण्यासाठी शरद पवार सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करू शकतात. तिथे आयोगाच्या निर्णयाला स्थगितीसाठी प्रयत्न करावा लागेल. पण, शिवसेनेचे नाव व चिन्हासाठी उद्धव ठाकरेंनी केलेल्या याचिकेवर अद्याप स्थगिती मिळाली नाही. त्यामुळे पवारांना अशी एखादी स्थगिती मिळेल असे वाटत नाही.राजकारणातील अत्यंत ज्येष्ठ, अनुभवी नेते असलेल्या शरद पवारांना निवडणूक आयोग नेमका कसा निकाल देतो? याची पूर्ण माहिती होती. त्यामुळे आयोगाने शिवसेना पक्ष व धनुष्यबाणाचे निवडणूक चिन्ह एकनाथ शिंदेंना बहाल केल्यानंतर त्यांनी उद्धव ठाकरे यांना नव्याने तयारी सुरू करण्याचा सल्ला दिला होता. 'निकाल लागल्यानंतर चर्चा करता येत नाही. निकाल स्वीकारायचा, नवीन चिन्ह घ्यायचं. त्याचा काही परिणाम होत नसतो. चिन्ह असो अथवा नसो, निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी ठेवली पाहिजे,' असे ते म्हणाले होते. त्यानंतरच्या काळात त्यांनी या मुद्द्याची सविस्तर मांडणी करताना मी स्वत: दोन बैल, चरखा, गायवासरू, पंजा व घड्याळ अशा वेगवेगळ्या ५ चिन्हांवर निवडणूक लढून जिकल्याची माहिती दिली होती.

---

## तळोधी (बा)येथे श्री संत संताजी जगनाडे महाराज जयंती महोत्सव संपन्न

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

जय संताजी तेली समाज
तळोधी ता. नागभीड

जय संताजी तेली समाज तळोधी (बा) च्या वतीने तेली समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या ३९९ वा जयंती महोत्सव वर वधू परिचय संमेलन व गुणवंताचा गुणगौरव समारंभ नुकताच राधाकृष्ण मंगल कार्यालय तळोधी (बा) येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष चांगदेव कामडी माजी जिल्हा परिषद सदस्य तळोधी (बा ),उदघाटक आमदार कीर्ती कुमार भांगडीया चिमूर विधानसभा क्षेत्र ,सह उद्घाटक गणेश तर्वेकर माजी उपनगराध्यक्ष नगरपरिषद नागभीड, प्रमुख अतिथी अजय पाकमोडे अध्यक्ष कोहिनूर नागरी पतसंस्था ,प्रमुख अतिथी विनायक घुगुसकर सेवानिवृत्त शिक्षक, वर्षा विनायक घुगुस्कर मुख्याध्यापिका सिंदेवाही , भास्कर पिसे पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन तळोधी, राजेश भगवान घिये सरपंच ग्रामपंचायत तळोधी,तथा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, दिलीप मोटघरे अध्यक्ष सेवा सहकारी सोसायटी, प्रा.अतुल कामडी तेली समाज अध्यक्ष,डोनू पाकमोडे अध्यक्ष बामणी सेवा सहकारी सोसायटी ,शीलाताई ठोंबरे सरपंच सोनापूर , सचिन मदनकर त.मु.स.अध्यक्ष.इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.या कार्यक्रमादरम्यान सकाळी १०.३० वाजता श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेची तळोधी नगरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली .दुपारी १२ वाजता श्री संताजी जगनाडे महाराज जयंती महोत्सव कार्यक्रम उद्घाटन समारंभ १ वाजता गुणगौरव सत्कार सोहळा, २ वाजता वधू वर परिचय संमेलन, २.३० वाजता प्रमुख अतिथींचे मार्गदर्शन दुपारी ४.३० वाजता समाज बांधवांचे स्नेहभोजन तसेच सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम पार पडले.तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणारे बाल गोपाळ यांना प्रमाणपत्र देण्यात आले.परिसरातील समाज बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली . संचालन तेली समाजाचे अध्यक्ष अतुल कामडी, प्रा.शुभांगी पाकमोडे यांनी केले तर आभार सचिव संजय डफ यांनी केले.

---

## वरोरा उपजिल्हा रुग्णालयात भव्य वैद्यकीय व दंत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत उपजिल्हा रुग्णालय, वरोरा
येथे
भव्य वैद्यकीय व दंत आरोग्य शिबीर
उद्घाटन, दि. ०८ फेब्रुवारी २०२४ सकाळी १०.०० वा.

सार्वजनिक आरोग्य विभागातील राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय वरोराच्या वतीने ८ फेब्रुवारीला भव्य वैद्यकीय व दंत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

आमदार प्रतिभा धानोरकर उदघाटक तथा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. महादेव चिंचोळे जिल्हा शल्य चिकित्सक, प्रमुख उपस्थित डॉ हेमचंद कन्नाके (नि वै अ.) डॉ. प्रफुल खूजे, वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय वरोरा , सुभाष दांदडे (आमदार प्रतिनिधी) डॉ प्रतीक बोरकर (तालुका आरोग्य अधिकारी), डॉ विरुटकर, डॉ. बोरकर उपस्थित होते. शिबिराचे प्रास्ताविक करताना डॉ चिंचोळे यांनी तालुक्यातील फ्लोराइड युक्त पाण्याच्या वापराने अस्थी व दातावर झालेल्या परिणामावर या शिबिरात होणाऱ्या उपचार याची माहिती विषद केली. उदघाटकीय भाषणात आमदार प्रतिभा धानोरकर यांनी उपजिल्हा रुग्णालयात उपलब्ध सेवा व सुविधा बाबत समाधान व्यक्त करीत नागरिकांनी या शिबिरात होणाऱ्या विविध तज्ञ डॉक्टर, सावंगी मेघे येथील वैद्यकीय चमू कडून उपचार व होणाऱ्या शस्त्रक्रिया यांचा लाभ घ्यावा असं आवाहन केलं. तसेच १०० खाटाच्या रुग्णालय इमारत बांधकाम निधी पाठपुरावा या बाबत माहिती दिली. शिबिराचे निमित्ताने पोषण आहार विभाग, एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र व क्षय रोग, एन सी डी , किटकजन्य रोग, सिकल सेल, आदी विभागाचे आरोग्य शिक्षण प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा समारोप डॉ खुजे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. शिबिरा करिता सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी परिश्रम घेतले. तर संचालन गोविंद कुंभारे व सोनाली रासपायले यांनी केले.

---

## कोलारी येथे श्री संत एकनाथ महाराज पुण्यतिथी साजरी

**चिमूर । प्रतिनिधी**



चिमूर तालुक्यातील शंकरपूर लगत असलेल्या कोलारी येथे दिनांक एक फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२४ या सात दिवशीय भागवत सप्ताह तथा गोपाल काल्याचा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री एकनाथ महाराज यांचा १०२ वा पुण्यतिथी महोत्सव हजारोंच्या संख्येत पार पडला. हा कार्यक्रम ६९ वर्षापासून या ठिकाणी साजरा होत आहे.

दरवर्षी या कार्यक्रमाची व्याप्ती वाढत असून गावाला जत्रेचे स्वरूप प्राप्त होत आहे.या सात दिवशीय भागवत सप्ताह मध्ये दररोज ग्रामसफाई, काकडा आरती, सामुदायिक ध्यान व प्रार्थना, विविध ठिकाणावरून येणाऱ्या पालखीचे आगमन, हरिपाठ व सायंकाळी सात ते नऊ श्रीमद भागवत कथा व त्यानंतर विविध भोजन मंडळाच्या भजनांच्या कार्यक्रमाचा आस्वाद भाविकांनी घेतला.या भागवत सप्ताह मध्ये रोज रात्री कुमारी क्रांती मंगेश काळे राहणार साखरी जिल्हा अमरावती यांच्या कीर्तनाचा लाभ भाविक भक्तांनी घेतला. तर शेवटच्या दिवशी ७ फेब्रुवारीला दुपारी बारा ते तीन ह. भ. प. देवेंद्रजी महाराज भुजाडे आळंदीकर यांचा गोपालक्याला चा कीर्तनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला चिमूर क्षेत्राचे आमदार कीर्ती कुमार भांगडिया हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून या देवस्थानला क दर्जा प्राप्त झाला असून महाराजांच्या कृपेने देवस्थानाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. शेवटी करता करविता तोच आहे आपण फक्त निमित्त आहोत आणि ते आपले भाग्य आहे असे उद्गार काढून आपण दिलेली देणगी ही एका हाताने दिली तर दुसऱ्या हातालाही करता कामा नये अशी असावी अशी सांगून संतांच्या पुण्यतिथी चे महत्व आणि त्यांचे कार्य याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने भक्त उपस्थित होते. त्यामुळे गावाला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.त्यानंतर गोपाल काल्याचा कार्यक्रम पार पडला व लगेच महाप्रसादाच्या कार्यक्रमाचा हजारो भाविकांनी आस्वाद घेतला व रात्री आठ ते ११ वाजता प्राध्यापक डॉक्टर प्रशांत महाराज ठाकरे अकोला यांचे कीर्तन झाले व त्यानंतर खिरापत व जागृती भजन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## कवियत्री वर्षा शेंडे नारी रत्न पुरस्काराने सन्मानित

पहिले अखिल भारतीय
पुरस्कार वितरण
Arjuni, Maharashtra 28-Jan-2024, 14:41

**चिमूर । प्रतिनिधी**

शंकरपूर येथील वर्षा अनिल शेंडे यांना मातोश्री जिजाऊ परिवर्तन मराठी साहित्य परिषद अर्जुनी मोरगाव येथील महाविद्यालयात पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात नारी रत्न अवार्ड २०२४ ने सन्मानित केले आहे. त्यामुळे परिसरात त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या साहित्य परिषदेच्या कार्यक्रमात पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्ष डॉक्टर शिवाजीराव शिंदे, सहाय्यक कुलसचिव पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर तर उद्घाटक या क्षेत्राचे स्थानिक आमदार मनोहर चंद्रिकापुरे तसेच प्रमुख पाहुणे डॉक्टर ईश्वर मोहरले, अंजनाबाई खुणे, झाडीपट्टीतील नामवंत कवियत्री हे होते. शंकरपूर येथील रहिवासी वर्षा अनिल शिंदे यांचे साहित्य व सामाजिक क्षेत्रात तसेच राजकीय क्षेत्रात फार मोलाचे योगदान आहे. त्यामुळे त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विदर्भात होणाऱ्या अनेक कवी संमेलनामध्ये त्या नेहमी आवर्जून भाग घेत असतात. त्यामुळे त्यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय व भरीव कामगिरी करीत असल्यामुळे नारी रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कवियत्री वर्षा शेंडे यांनी हा पुरस्कार मला माझ्या पतीकडून मिळालेले स्वातंत्र्य व मदत त्यामुळे मी या साहित्य क्षेत्रात तसेच सामाजिक क्षेत्रात भरारी घेतली यापुढे माझे हे लक्ष अबाधित राहील असे मनोगत व्यक्त केले. या पुरस्कारामुळे त्यांचे वर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

### साहेब आम्हाला जमिनीचे पट्टे द्या

## आदिवासी पारधी समाजाचे तहसीलदारांना निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

पारधी समाज हा पुर्वी भटकंती करून वन्य पशु पक्षांची शिकार करून यावर आपली उपजीविका भागवत असे.परंतु शासनाने शिकारीवर कायम स्वरुपी बंदी घातल्याने पारधी समाजावर उपासमारीची वेळ आली आहे. समाजातील काही लोकांनी पोटाची खळगी भरण्यासाठी शासकीय वनजमिनींचा ताबा घेऊन शेती कसत आहे.त्या शेतजमीनिचे आम्हाला मालकी हक्काचे पट्टे द्या ना साहेब म्हणत आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र शेरकुरे यांच्या नेतृत्वाखाली वरोरा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. असंच एक गाव वरोरा तालुक्यातील येंन्सा ग्रामपंचायत अंतर्गत कोंढाळा पारधी टोला हे गाव येते,पारधी समाजाची जेमतेम दहा बारा घरांची वस्ती असुन अतिक्रमित शेती करतात.अनेकदा ग्रामपंचायत वन हक्क समिती कडे पट्ट्यासाठी अर्ज केले परंतु गावातील पुढारी ,सरपंचांनी द्वेष भावनेतून फेटाळून लावल्याचे पारधी बांधव सांगतात,सन १९८० पासून सातबारा वर अतिक्रमणाच्या नोंदी असल्याने आम्ही वन हक्क कायदा (२००६) नुसार पट्याचे हक्कदार आहोत असे तेथील पारधी समाजाचे म्हणने आहे. मालकी हक्काचा सातबारा नसल्याने शासनाच्या सोयीसुविधांचा लाभ मिळत नाही.तसेच शेती करण्यासाठी लागणारी पैसा सोसायटी किंवा बँका कर्ज देत नाही.त्यामुळे आमचा विकास खुंटला आहे अशी व्यथा पारधी बांधवांनी वरोरा तहसीलदार योगेश कौटकर यांचेकडे मांडली .

पावसाळ्यात ये जा करण्यासाठी रस्ता नाही.जो आहे तोही बेलगाव सन प्लॅग कोळसा खदानिच्या जमिनीतुन पाणी उपसा करण्यासाठी बोर मारणाऱ्या जड वाहतुकीमुळे रस्ता पुर्ण उद्धस्त झाला असून रहदारी करिता डांबरीकरण मजबूत रस्ता बांधण्याची मागणी करण्यात आली तसेच पारधी टोला येथे फ्लोराईड युक्त पाणी पित असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून जल शुद्धीकरण मशिन द्वारे शुद्ध पाणी पुरवठा ग्रामपंचायतीने करावा . पारधी बांधवांना संजय गांधी निराधार योजना, अंत्योदय योजना, पारधी आवास योजना,शबरी घरकुल योजना,यांचा लाभ देण्यात यावा अशी मागणी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली .यावेळी धर्मेंद्र अंकुश शेरकुरे, गजानन कारु पवार,वैशाली पवार, अर्चना पवार, आदी समाज बांधव उपस्थित होते.

# बाबा आमटे यांच्या विचारांची प्रासंगिकता

**विचार आणि आचारातील एकरूपता म्हणजे जागतिक कीर्तीचे थोर समाजसेवक मुरलीधर देवीदास आमटे होय असे म्हणता येईल. कुटुंबातील लोक विशेषतः त्यांच्या आई लक्ष्मीबाई लहानपणी त्यांना प्रेमाने बाबा म्हणत असत. त्यामुळे पुढे बाबा आमटे हेच नांव प्रचलित झाल्याने पुढे ते बाबा नावानेच ओळखले जाऊ लागले. ज्यांच्या कर्तृत्ववाला वटवृक्ष ही उपाधीही अपुरी पडावी असे त्यांचे अद्वितीय कार्य होते.**

**डॉ.यशवंत घुमे**
मो.९८२२२३३९१२
e sahyandrinews@gmail.com

बाबांमध्ये विश्वमित्रासारखी जिद्द आणि नवनिर्माणाची कुवत होती. सत्प्रवृत्तींचा तजेला टवटवीत ठेवायला, फोफवायला सतकृतींचे सदाबहार खतपाणी आवश्यक असते. बाबांना ते आई लक्ष्मीबाईंच्या बालपणीच्या संस्कारातून मिळाले. येशू ख्रिस्त, राष्ट्रपिता महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, परमपूज्य साने गुरुजी, कविवर्य रवींद्रनाथ टागोर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन बाबांनी कृतिशील समाजकार्य सुरू केले. या महामानवांच्या वैचारिक प्रभावाने कृतिशील आयुष्य जगणाऱ्या बाबांच्या हातून चिरंतन टिकणारे कार्य घडत गेले. गावकुसाबाहेरील माणसांच्या प्रश्नांसाठी म्हणजेच कुष्ठरोग्यांच्या रोगमुक्ती आणि पुनर्वसनासाठी त्यांनी जातपात, धर्म, प्रांत असा कोणताही भेदभाव न करता आयुष्यभर मानवधर्माचे आचरण केले. एकदा समाजकार्याची लगन लागले की एका समग्र रचनेत बसणाऱ्या शेकडो प्रवृत्ती सुरू करण्याची उपक्रमशीलता संचालकात येते तशी बाबांमध्ये आली. स्वतः कुष्ठरोग्यांसोबत राहून कुष्ठरोग्यांची सेवा केली. कुष्ठरोग संसर्गजन्य नाही हे बाबांनी स्वकर्तृत्वाने जगाला पटवून दिले. त्यांच्या या कार्यात बाबांच्या पत्नी साधनाताई यांनीही अपार कष्ट घेत मोलाची साथ दिली. कुष्ठपिडीतांच्या जीवनातील सगळी कुरूपता नष्ट करण्यासाठी काही समविचारी लोकांना सोबत घेऊन वरोरा येथे २१जुन,१९५१ रोजी महारोगी सेवा समितीची स्थापन केली. या समितीच्या माध्यमातून समाजातील दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी हा महात्मा अविरत अखंडपणे धावतच राहिला. थांबणे त्यांच्या कर्तुत्वाला मान्य नव्हते. त्यांनी भान राखून योजना आखल्या आणि बेभान होऊन त्या राबवल्या. शरीरात प्राण असेपर्यंत कार्यरत राहायचा ध्यास बाबांनी घेतला होता.

बाबा आमटे पुरोगामी विचारांचे होते. संत ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगायचे तर हे विश्वची माझे घर या संतपदाला बाबा पोहोचलेले होते. जातपात, धर्म, देश, भाषा, प्रांतभेद या सीमांचे बंधन त्यांनी तोडले होते. आनंदवनात फक्त माणूसच राहतो. मानवता हीच त्याची ओळख. व्यक्तीच्या गुणांना अधिकाधिक उजाळा मिळत गेला की तिचे दोष आपोआपच मागे हटत जातात. अत्यंत साधी राहणी व उच्च विचारसरणी असे बाबांचे व्यक्तिमत्व होते. बाबांना कर्मकांड मान्य नव्हते. विज्ञानविषयक विचारांना त्यांचे प्राधान्य होते. उपास-तापास, नवस-सायास या गोष्टी त्यांना पटत नव्हत्या. माणूस जिवंत आहे तोपर्यंत त्याच्या देहाला महत्त्व आहे. म्हणून मृत शरीरासाठी विधी करण्याची आवश्यकता नाही. माणूस जिवंत असताना त्याची जमेल तेवढी सेवा केली पाहिजे हे माणूस घडविणारे तत्वज्ञान बाबा मांडत असत. मृत्यूमुळे आपली आवडती व्यक्ती आपल्या नजरेआड होते पण आपल्यापासून दुरावत नाही असे त्यांचे मत होते.

राष्ट्रभक्ती बाबांच्या रोमारोमात होती. म्हणून जेव्हा जेव्हा देश संकटात आहे याची बाबांना जाणीव होत, तेव्हा तनमन अर्पून ते देशकार्यातही धावून गेले. १९८४ मध्ये भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिराजी गांधी यांची त्यांच्या अंगरक्षकांकडून अमानुषपणे हत्या झाली. त्याचे पडसाद संपूर्ण देशभर पसरले. दंगल, जाळपोळ, मारामाऱ्या, सामाजिक गोंधळ यामुळे सारे वातावरण ढवळून दूषित झाले होते. देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होतो की काय? असे वातावरण निर्माण झाले होते. देशात एकप्रकारे सामाजिक दुही माजली होती. सारा देश अमानवीय वणव्यात होरपळत असताना मानवतावादी आणि शांततेचा पुरस्कार करणाऱ्या बाबांसमोर चिंता निर्माण झाली. बाबा विचलित झाले. दुभंगलेली मने जोडली पाहिजेत हा विचार त्यांच्या मनात जागा झाला. संपूर्ण भारतवासीयांत बंधुभाव प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. मानवी प्रेमाची साखळी निर्माण करण्यासाठी भारत जोडो अभियानाचा संकल्प सोडला. २४ डिसेंबर, १९८५ ला सानेगुरुजींच्या वाढदिवशी भारत जोडो ला सुरुवात झाली. कन्याकुमारी येथून भारत जोडो अभियानाची सुरुवात झाली. एकूण १०७ दिवसांचे हे अभियान होते. या अभियानात



**मंदिर मस्जिद गिरिजाघर ने**
**बाट लिया भगवान को**
**धरती बॉटी सागर बॉटा**
**मत बॉटो इन्सान को**
**जाती जाती की बात छोडो,**
**भारत जोडो, भारत जोडो**
**आओ सब मिलकर बोलो,**
**जोडो भारत, भारत जोडो**
**हम युवाओंका एक ही नारा**
**बटेना भारत, कभी हमारा**

अशा नाऱ्यांनी आसमंत दणाणून जात .अशा गीतांनी व घोषणांनी देशात नवचैतन्य निर्माण केल. संपूर्ण देशाचे लक्ष या यात्रेने वेधून घेतले होते. चौदा राज्यांतून ५०४२ किलोमीटरचा प्रवास करीत या अभियानाने भारतीयांच्या मनात प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.सर्व राज्यातील लोकांनी अतिशय मनापासून स्वागत केले. देशासाठी मरावे कसे? हे सगळे सांगतात. पण देशासाठी जगावे कसे? हे मात्र कोणीच सांगत नाही ते बाबांनी सांगितले. बाबांची स्वतःची प्रकृती ठीक नसल्याने डॉक्टरांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला. पाठीच्या दुखण्याचा त्रास वाढलेला होता. त्यांना नीट बसताही येत नव्हते. केवळ बिछान्यावर झोपून राहणे किंवा उभे राहणे हे दोनच पर्याय त्याच्यासमोर होते. त्यामुळे सारा प्रवास त्याना झोपूनच करावा लागत असे. तरीही बाबांनी भारत जोडणाऱ्या या यात्रेचे नेतृत्व केले. देशभराच्या विविध भागांतून आलेल्या १२५ सायकलस्वरांच्या सोबत कन्याकुमारी ते कश्मीर हे भारत जोडो अभियान राबविले. सोबतच यात्रेमध्ये वृक्षारोपण, पथनाट्ये, कथाकथनाद्वारे त्यांनी भारतीयांचे लोकप्रबोधन केले जात. देशवासीयांत शांततेचा व समतेचा संदेश देत भाषणांतून राष्ट्रीय एकात्मतेची गरज प्रतिपादन केली जायची. यामुळे तत्कालीन युवकांमधील द्वेषाची भावना कमी करण्यात निश्चितच उपयोग झाला. विविध भाषा बोलणार्या लोकांसोबत संवाद साधत भारत जोडो यात्रेचा पहिला टप्पा १० एप्रिल, १९८६ रोजी जम्मू येथे समाप्त झाला. पहिले मिशन यशस्वी झाल्यानंतर बाबांनी १ नोव्हेंबर, १९८७ ते २६ मार्च, १९८८ या कालावधीत भारत जोडो अभियानाचा दुसरा टप्पा ठरवला. १४६ दिवसांच्या या कालावधीत एकूण ७५४६ किलोमीटरचे अंतर प्रवास केला. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार देणारे बाबांचे जोडो भारत अभियान सामाजिक सलोखा निर्माण करण्यात यशस्वी झाले. विशाल पसरलेल्या भारतीय उपखंडाला एकत्र आणणारी ही भारत जोडो यात्रा तत्कालीन परिस्थितीत युवकांसाठी दीपस्तंभ ठरली. देशाच्या नवनिर्माणासाठी मी भारत जोडो यात्रा सुरू केली आहे. युवा चेतना जागवणे, युवा कंपनी निर्माण करणे यासाठी ही धडपड असल्याचे मत बाबांनी व्यक्त केले. मातेवर प्रेम कराच पण त्याहीपेक्षा अधिक प्रेम आपल्या मातीवर करा असे विचार ते वाटत.समाजासमाजांमध्ये, धर्माधर्मांमध्ये, जातीजातींमध्ये फूट पाडण्याचे षडयंत्र राजकीय नेते करीत आहेत. कारण त्या आधारावरच ही मंडळी निवडून येतात. अशा असंख्य प्रश्नांची जाण व समज वाढविण्याचे कार्य त्याकाळी भारत जोडो अभियानाने केले. हे प्रश्न मोठ्या प्रमाणात जिवंत असल्याने देशाप्रती आयुष्य समर्पित करण्यासाठी, युवकांच्या मनात देशभक्ती जागविण्यासाठी बाबा आमटे यांच्या विचारांची आजही गरज आहे. तरुणांना घडविण्याचे कार्य त्यावेळी भारत जोडो अभियानाने केले, देशातील अलीकडील वातावरण बघता बाबांच्या विचाराची आजही आवश्यकता आहे असे वाटते. तरूणांसाठी बाबांचे दुसरे उल्लेखनीय कार्य म्हणजे मूल जवळील सोमनाथ येथील श्रमसंस्कार छावणी होय. तरुण पिढीची वाया जाणारी काही शक्ती विधायक कार्याला लागावी या हेतूने बाबांनी युवकांसाठी वर्कर्स युनिव्हर्सिटीची स्थापना केली. युवकांना माणूस घडविणारे अभियान म्हणून या प्रयोगाकडे पाहावे लागेल.१९६८ पासून सोमनाथच्या जंगल परिसरात वर्कर्स युनिव्हर्सिटीचे कार्य सुरू झाले.तरुणांमध्ये नकारात्मकतेची भावना मोठ्या प्रमाणात दिसून आल्याने दूर करण्यात सोमनाथ येथील श्रमसंस्कार छावणीने महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. श्रमसंस्कार छावणीच्या आयोजनाने तरुणांमध्ये देशप्रेमाची भावना निर्माण होऊन सकारात्मकता पसरली. त्यामुळे श्रमसंस्कार छावणी म्हणजे युवकांमध्ये देशप्रेमाची पेरणी करणारे केंद्र ठरले.चैतन्यमय माणसे घडविण्यासाठी बाबांचा हा उद्योग होता. नवनिर्मितीच्या धुंदीने वेडे केलेल्या बाबांना तरुण पिढीचा एक सैनिक व्हायचे होते. या शिबिरातून आजवर लाखो युवक युवती सुसंस्कारित झाले आहेत. देशाला थरथर कापणारी भेकड नवी पिढी नको आहे तर उत्साहाने भरलेली आणि समर्पित भावनेने ओथंबलेली अशी तरुणाई पाहिजे आहे असे बाबांना वाटत. बाबांच्या कामांतून प्रेरणा घेऊन अनेक युवक समाजसेवेत सक्रीय आहेत. आपापल्या क्षेत्रात नावलौकिक मिळवीत आहेत.आनंदवन असो, सोमनाथ असो की हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्प असो महारोगी सेवा समितीच्या अंतर्गत संचलीत विविध प्रकारच्या जवळजवळ २८ विविध उपक्रमांतून बाबांचे पुत्र डॉ.विकास आमटे, डॉ.प्रकाश आमटे आणि आता तिसऱ्या पिढीचे विधायक कार्य तरूणाईला आजही कार्यप्रवण करीत आहेत.मानवतेचे पुजारी असलेल्या अशा या महामानवाचे ९ फेब्रुवारी, २००८ रोजी पहाटे ४.१५ वाजता आनंदवन येथे वयाच्या ९४ व्या वर्षी महापरिनिर्वाण झाले.श्वासाच्या अखेरीपर्यंत हा महात्मा सतत अखंडपणे चालतच राहिला.थांबणे त्यांना माहीतच नव्हते. आज बाबा हयात नाहीत. परंतु त्यांचे विचार तरूणाईला आजही प्रेरणादायी आहेत. स्वातंत्र्याच्या ७ दशकांनंतरही तरूणाई समोर येणाऱ्या अनेक समस्या जैसे थे आहेत. वर्तमानकाळात जातीपातीला प्राधान्य देणारे वातावरण निर्माण झलेले दिसत आहे. सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय भावना कागदांत बंदिस्त झाली की काय? असे वातावरण आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष देशाच्या भवितव्याचे पहारेकरी असतीलही पण या पहारेकऱ्यांवरही पहारा ठेवणारे लोक हवे असतात असे बाबा म्हणत असत. आज देशात नोटांसारखाच आश्वासनांचाही चलन फुगवटा झाला आहे.त्यामुळे बाबा जरी देहाने दूर गेले तरी सर्व जातीपातीच्या भिंती गळून सगळ्यांना राष्ट्रभावनेच्या एका बंधनात आणण्यासाठी बाबांच्या विचारांची प्रेरणा आजही उपयुक्त ठरणार आहे याविषयी दुमत नाही.

---

# जनगणना का व कशी केली जाते जी, गुरूजी?

**लोकांची मोजणी करण्याची प्रथा शासनव्यवस्थेच्या स्थापने इतकीच जुनी आहे. ईजिप्शियन, ग्रीक, रोमन, हिब्रू, पर्शियन, या लोकांनी लोकसंख्येची मोजणी वेळोवेळी केल्याचे इतिहासात नमूद आहे. चीन-जपानमध्येही पुरातन काळापासून अशी मोजणी होत असे. साधारणतः अशी मोजणी सैन्यभरतीस योग्य वय असलेल्या नागरिकांची किंवा करपात्र लोकांची संख्या समजण्यासाठी जरूर तेव्हा होत असे. सबंध शहराची लोकसंख्या मोजण्यास यूरोपमध्ये पंधराव्या व सोळाव्या शतकांत सुरुवात झाली. मद्रास शहराची अशी लोकसंख्या मोजणी सन १६८७मध्ये झाल्याचे नमूद आहे. त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाची जनगणना सुरू झाली. सरकारला ओबीसी प्रवर्गातील लोकांची वेगळ्या रकान्यातून जनगणना करावीच लागेल. का व कशी? यावर जोर देणारा लेख श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी यांच्या रोखठोक शब्दांतून... संपादक.**



स्वीडनमधील पहिली जनगणना सन १७५०मध्ये झाली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात १७९० पासून व ग्रेट ब्रिटनमध्ये १८०१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येतात. भारतात पहिली जनगणना दि.९ फेब्रुवारी १८७२ रोजी सुरू करून ती काही महिन्यांती पार पडली व त्यानंतर सन १८८१पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात आल्या. काही राष्ट्रे जनगणना दर पाच वर्षांनी घेतात, तर काही त्यांना जरूर वाटेल तेव्हा जनगणना करतात. हे काम बरेच खर्चाचे असल्यामुळे बहुतेक राष्ट्रांत दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची प्रथा आहे. सुरुवातीस जनगणनेच्या वेळी प्रत्येक कुटुंबाविषयीची माहिती गोळा करीत, परंतु नंतर प्रत्येक व्यक्तीबद्दल माहिती गोळा करण्यात येऊ लागली. पुढे पुढे गरीब, दुर्बल, मागास समाज घटकांची माहिती घेतली जाऊ लागली. आता इतर मागासवर्ग- ओबीसींची माहिती गोळा करणे क्रमप्राप्त व अत्यावश्यक नाही का? अशी व्यक्तिगत स्वरूपाची राष्ट्रीय जनगणना सर्व प्रथम बेल्जियममध्ये सन १८४६मध्ये व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सन १८५०मध्ये घेण्यात आली. हळूहळू सर्वच राष्ट्रांनी अशा प्रकारची जनगणना घेण्यास सुरुवात केली. सन १९६०च्या सुमारास सबंध जगात एकूण १८०हून अधिक जनगणना घेण्यात आल्या आहेत. त्यात लोककल्याणाच्या उदयोन्मुख समस्या व प्रश्नांना प्राधान्याने घेऊन त्यासाठी विकासात्मक धोरण अवलंबिले आहेत. हे काय खोटे आहे?

स्वातंत्र्यपूर्व काळात आठ व स्वातंत्र्योत्तर काळात तीन वेळा जनगणना या भारतात झाल्या. वेळोवेळी जनगणना अधिनियम संमत करण्यात येऊन त्यांनुसार जनगणना घेतली जाते. त्यासाठी आयुक्त, संचालक, पर्यवेक्षक वगैरे अधिकारी नेमण्यात येतात. त्यांना इतर अधिकाऱ्यांची मदत होते. प्रत्यक्ष गणनेचे काम प्रगणकांकडे सोपविण्यात येते. शिक्षक, पोलीस, जिल्हा परिषदांचे व नगरपालिकांचे कर्मचारी या सर्वांची मदत गणनेसाठी घ्यावी लागते. त्यांची निवड झाल्यावर जनगणना कशी घ्यावी? निरनिराळ्या याद्या व अनुसूच्या कशा वापराव्यात? प्रश्नांवलीतील प्रश्नांची उत्तरे कशी लिहून घ्यावीत? आदी बाबींचे त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. त्यांच्याकडून नमुन्यादाखल काही माहितीही गोळा करून घ्यावी लागते. सन १९७१मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी प्रगणकाला चार प्रकारच्या याद्या तयार कराव्या लागल्या होत्या. आज इतर मागासवर्ग आपली जनसंख्या जाणून घेण्याच्या मनस्थितीत आहे, तेव्हा त्यांचीही माहिती वेगळ्या रकान्यातून करणे प्रशासनाला अत्यंत निकडीचे आहे, आढेवेढे घेऊन ते टाळणे महागात पडू शकते. कारण व्यक्तिगत पट्टीद्वारा गोळा केलेली सर्व माहिती गोपनीय मानली जाते. देशाच्या काही भागांत स्थानिक वा राजकीय अडचणींमुळे गणनेच्या कालखंडात आवश्यक ते फेरफार करावे लागतात. जनगणनेत गोळा झालेल्या माहितीचे जिल्हागणिक आणि राज्यागणिक संकलन करून तात्पुरत्या स्वरूपाचे आकडे जनगणनेचे काम संपल्यापासून पाच दिवसांच्या आतच मध्यवर्ती जनगणना कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकतात. यावरूनच या अवाढव्य प्रशासकीय प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या संघटनात्मक प्रयत्नांची व भारतीय जनतेने दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याची काहीशी कल्पना येऊ शकते. याकामी जनतेचे सहकार्य फार मोलाचे ठरते. आता जर का भारत सरकारने इतर मागास वर्ग- ओबीसी समाजघटकातील लोकांच्या इच्छेविरुद्ध जनगणना सुरू केली तर त्यांचे सहकार्य मिळणे शक्यच नाही. हा संपूर्ण घटक- समूह पुढील प्रत्येक जनगणनेवर बहिष्कार टाकण्याच्या पावित्र्यात खंबीर उभा ठाकला आहे. त्यामुळे देशाच्या विकास कार्यास खिळ बसणे साहजिकच आहे.

जनगणना म्हणजे एखाद्या राष्ट्राच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांची मोजणी होय. आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्रातील शासनाचे हे एक अटळ कर्तव्य झाले आहे. राष्ट्राची लोकसंख्या किती? त्यातील लोकांची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये कोणती? त्यांचे राष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत वितरण कसे झाले आहे? सामाजिक व जीवशास्त्रीय फेरफारांचे त्यांच्यावर कसकसे परिणाम होतात? आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किती? सामाजिक घटक कोणते? त्या त्या सामाजिक घटकांतील लोकसंख्या किती? आदी अनेक प्रश्न दैनंदिन प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरतात. त्यांना यशस्वीरित्या हाताळण्यासाठी आवश्यक असलेली माहिती जनगणनेद्वारा उपलब्ध होते. शासनाला केवळ जनगणनाच नव्हे, तर प्रसंगोपात इतर अनेक प्रकारच्या गणना करण्याची आवश्यक भासत असते. उदा. कृषिगणना, पशुधनगणना, उत्पादनगणना, घरांची मोजणी, जनगणना इत्यादी. मग ओबीसी जनगणना का बरे होऊ नये? अशा सर्व गणनांतून उपलब्ध होणारी आकडेवारी राष्ट्रीय प्रगती दर्शविते व राष्ट्राच्या अनेक समस्यांचा उलगडा करण्यास उपयोगी पडते. विशेष करून जनगणनेद्वारे मिळणाऱ्या माहितीतून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व राष्ट्राचे मानवी भांडवलरूपी सामर्थ्य यांवर यथोचित प्रकाश टाकला जाऊ शकतो. जनगणना म्हणजे विशिष्ट काळी एखाद्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील सर्व लोकांबद्दलची जनांकिकीय, आर्थिक व सामाजिक आकडेवारी गोळा करणे आणि तिचे योग्य संकलन करून तिला प्रसिद्धी देण्याची संपूर्ण प्रक्रिया होय. जनगणनेच्या सहा वैशिष्ट्यांवर संयुक्त राष्ट्रांनी भर दिला आहे- जनगणनेला राष्ट्राचा पुरस्कार पाहिजे, तिचे क्षेत्र व घटक निश्चित असले पाहिजे, त्या क्षेत्रातील सर्व व्यक्तींचा त्यात समावेश झाला पाहिजे, ती गोळा केलेली माहिती विशिष्ट कालक्षणाबद्दल असली पाहिजे, प्रत्येक व्यक्तीविषयी अलग-अलग माहिती नमूद केली पाहिजे, गोळा केलेली माहिती प्रसिद्ध झाली पाहिजे. जनगणना करताना संबंधित राष्ट्रे त्यांना त्या वेळी महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींविषयी माहिती गोळा करतात. कालमान व परिस्थिती यानुसार निरनिराळ्या जनगणनांतील बाबी वेगवेगळ्या असू शकतात. जनगणनेत खालील बाबींचा समावेश हवा, असे संयुक्त राष्ट्रांनी सुचविले आहे- जनगणनेच्या वेळी व्यक्तीची स्थाननिश्चिती व नेहमीचे राहण्याचे ठिकाण, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, जन्मस्थळ, नागरिकत्व, आर्थिक व्यवसाय, उद्योग, हुद्दा, भाषा, वंशत्व व राष्ट्रीयत्व, साक्षरता, शैक्षणिक पातळी, शालेय हजेरी व प्रत्येक स्त्रीला किती अपत्ये झाली त्यांची संख्या नोंद करावी. ज्या राष्ट्रांना या सर्व बाबींचा जनगणनेत समावेश करता येणे शक्य नसेल, त्यांनी किमानपक्षी लिंग, वय, वैवाहिक स्थिती व आर्थिक व्यवसाय याबाबींची माहिती तरी गोळा केलीच पाहिजे. मागील सन २०११च्या शिरगणतीनंतर म्हणजेच दहा वर्षांनंतर सन २०२१मध्ये होणे क्रमप्राप्त असताना सरकारने जनगणना करण्याकडे जाणूनबुजूनच कानाडोळा केला. आज जनगणनेविना तब्बल ३ वर्षे उलटून गेली. ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेला सरकार टरकले की काय? एक न उलगडणारे कोडेच आहे तर....

जनगणना दोन प्रकारांनी करता येते. एकतर प्रत्येक कुटुंबप्रमुखाकडून छापील प्रश्नावली भरून घ्यावयाची किंवा गणना करणाऱ्यांनी कुटुंबप्रमुखांना समक्ष भेटून माहिती घ्यावयाची आहे. काही देशांत जनगणनेपूर्वी सर्व घरांची यादी व मोजणी करतात व तिच्या आधारे जनगणनेच्या वेळी कोणीही वगळले जाऊ नये, अशी काळजी घेतात. गोळा केलेल्या माहितीचे त्वरित संकलन व सारणीकरण व्हावे, अशी व्यवस्था करावी लागते. त्यानंतरच सारणीरूपाने निरनिराळ्या बाबींविषयींची वर्गीकृत माहिती प्रसिद्ध करता येते. जनगणना अपूर्ण राहू नये, तिच्यात चुका होऊ नयेत यांसाठी प्रश्नावली तयार करण्यापासून ते थेट अखेरच्या आकडेवारीचे संकलन प्रसिद्ध करेपर्यंत प्रत्येक टप्प्याला शक्य तेवढी काळजी घ्यावी लागते. जनतेचे पुरेपूर सहकार्य आणि कार्यक्षम प्रशासन यंत्रणा यांशिवाय जनगणनेची कार्यक्षमता व गुणवत्ता पूर्णपणे समाधानकारक असूच शकत नाही. जनगणना अनेक कारणांसाठी घेतली जाते. सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न करण्यासाठी ती आवश्यकच ठरते. आरोग्य, साक्षरता, शिक्षण, उत्पन्न, राहणीमान, अन्नपुरवठा, कृषिउत्पादन, औद्योगिक उत्पादन आदी क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याच्या योजना आखण्यासाठी बऱ्यांच विविध माहितींची आवश्यकता असते. मतदान पद्धतीने लोकप्रतिनिधी निवडणे व कल्याणकारी राज्यातील सुविधांचे योग्य वाटप करणे, यांसाठीही जनगणेतील माहिती उपयोगी पडते. उद्योगपती व व्यापारी संख्या जनगणनेच्या आधारे आपापल्या व्यवसायांचे योग्य नियोजन करू शकतात. शिवाय आर्थिक, सामाजिक व जनांकिकीय प्रश्नांवर संशोधन करणाऱ्यांना जनगणनेमधून उपलब्ध होणारी माहिती अनेक दृष्टींनी उपयुक्त असते. म्हणूनच जनगणनेला संशोधनाचे आणि प्रशासनाचे एक बहुउद्देशीय साधन मानतात. सन १९६१पूर्वी जनगणनेसाठी लागणारी संघटना प्रत्यक्ष गणनावर्षापूर्वी एकदोन वर्षे अगोदरपासून अस्तित्वात येई व जनगणनेची कार्यवाही संपल्यानंतर दोनतीन वर्षांतच विलयास जाई. त्यामुळे जनगणनेच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष पुरविणाऱ्या संघटनेचा भारतात अभाव होता. ही उणीव सन १९६१नंतर भरून काढण्यात आली. केंद्र, प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेश यांत आता जनगणना कार्यालये सातत्याने कार्यप्रवण असतात. त्यांना आगामी जनगणनेची पूर्वतयारी करण्यास पुरेसा अवधी मिळतो. जनगणनेच्या वेळी राज्यांसाठी नेमण्यात येणाऱ्या पर्यवेक्षकांना आता जनगणना संचालक म्हणतात. सन १९७१च्या जनगणनेसाठी जनगणना आयुक्त आणि महानिबंधक या अधिकाऱ्यांची नेमणूक सन १९६८मध्ये व बहुतेक राज्य संचालकांच्या नेमणुका सन १९६९मध्येच करण्यात आल्या होत्या. मग इतर मागासवर्ग- ओबीसींची स्वतंत्र रकान्यात नोंद करून घेण्यास अडचणी येतीलच कशा?

!! भारतीय जनगणना आरंभ दिनाच्या सप्ताहभर सर्व सूज्ञ भारतीय बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

## गोळीबाराशी फडणवीसांचा काय संबंध?

# त्यांनी लोकांना गोळ्या मारण्यास सांगितले का?-छगन भुजबळ

**मुंबई**–भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या गोळीबारामुळे उपमुख्यमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणी फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. ती अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी जोरकसपणे फेटाळून लावली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी लोकांना गोळ्या घालण्यास सांगितले होते का? असा प्रश्न त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या पोलिस ठाण्यातील गोळीबाराप्रकरणी देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. भाजपकडे कोणतीही नैतिक राहिली नाही. पोलिस ठाण्यात गोळीबार करण्याची ही कोणती सत्तेची मस्ती आहे. मी संसदेत हा मुद्दा मांडेन. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचीही या प्रकरणी भेट घेईल. या प्रकरणी देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा दिला पाहिजे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.सुप्रिया सुळे यांच्या या टीकेचा राज्याचे अन्न व नागरी

पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी खरपूस शब्दांत समाचार घेतला. देवेंद्र फडणवीस यांनी काय लोकांना गोळ्या मारण्यास सांगितले होते का? त्यांचा या प्रकरणाशी काय संबंध? ही घटना आपसातील वादातून घडली आहे. अशी वैयक्तिक भांडणे सुरुच असतात. मला सुद्धा एकजण धमकी देत आहे. जिवे मारण्याची धमकी देत आहे. आता या प्रकरणात फडणवीस काय करणार? ते कायद्यानुसार कारवाई करतील, असे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.भाजप आमदाराने गोळीबार केल्यामुळे मला आश्चर्य वाटले. हा प्रकार पोलिस ठाण्यात घडला. त्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ज्यांना गोळ्या लागल्या ते वाचले हे महत्त्वाचे आहे. या प्रकरणी नेमके काय घडले हे पहावे लागेल. आमदार गणपत गायकवाड यांच्यावर हल्ला झाला होता का? त्यांनी स्वतःला वाचवण्यासाठी गोळीबार केला का? हे तपासावे लागेल. या प्रकरणी एकाच बाजूवर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. अन्यथा आंतरवाली सराटीसारखे होईल, असेही छगन भुजबळ यावेळी बोलताना म्हणाले.आंतरवाली सराटीत पोलिसांवर हल्ला झाला होता. त्यात ८० पोलिस जखमी झाले होते. त्यानंतर लाठीचार्जचे आदेश देण्यात आले. पण या प्रकरणी दुसरीच बाजू समोर आली. पहिली बाजू कुणीही पाहिली नाही. त्यामुळे या प्रकरणात नेमके काय झाले? हे पहावे लागेल, असे छगन भुजबळ म्हणाले.ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर हरिभाऊ राठोड लोकांना मूर्ख बनवत आहेत. ओबीसी प्रकरणी बबनराय तायवाडे यांची काही मते आहेत. ती बरोबर आहेत. पण हरिभाऊ यांच्या मते ओबीसीचे आरक्षण १७ टक्के आहे. त्यातील १० टक्के आरक्षण मराठा समाजाला देऊन उर्वरित ७ टक्के ओबीसींना द्या ही साफ चुकीचे आहे.

# राज्यात गुंडाराज उभा करण्याचा सरकारचा प्रयत्न– नाना पटोले

## मुंबईच्या घटनेने भाजपचा बुरखा फाटला

**मुंबई**–भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे गटाचे माजी नगरसेवक महेश गायकवाड यांच्यावर थेट पोलिस स्टेशनमध्येच गोळीबार केला. याप्रकरणी काँग्रेस नेते नाना पटोले यांनी भाजप आणि शिंदे गटावर टीका केली आहे. सरकारकडून राज्यात गुंडाइझम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. गुंडाराज उभा करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप पटोले यांनी सरकारवर केला आहे. तसेच या प्रकरणात सरकार काय भूमिका घेणार? याकडे लक्ष देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाजपकडून आम्ही चांगले राज्य चालवतो, असे सांगण्यात येते. आम्ही स्वच्छ असल्याचेही भाजप वारंवार सांगत असते. आता या घटनेनंतर भाजप रामराज्य कसे चालवते? हे सर्वांनाच कळाले आहे. या घटनेने भाजपचा बुरखा फाडला आहे. ही घटना अत्यंत निंदनीय अशी आहे. या घटनेचा आम्ही निषेध व्यक्त करत असल्याचेही नाना पटोले म्हणाले.यापूर्वीही गणपतीच्या काळात सदासरवणकर यांनी गोळ्या झाडल्या होत्या. राज्यात सरकारकडून तानाशाही, गुंडाशाही निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. लोकांच्या घामाचा पैसा हे सरकार लुटत असल्याचा आरोपही पटोलेंनी सरकारवर केला आहे. तसेच सरकारमध्ये बसलेले हे लुटेरे लोक असल्याचेही ते म्हणाले. सरकारला जर जनाची किंवा मनाची लाज असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी सरकारकडे केली आहे.सरकारच्या अशा वागण्यामुळे पोलिसांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. पुण्यात काल विद्यापीठात रामलीला कार्यक्रमात सिता मातेला सिगारेट पितांना दाखवण्यात आलं. आमच्या युथ काँग्रेसच्या मुलांनीही याचा निषेध व्यक्त केला. परंतु तरीदेखील युथ काँग्रेसच्या मुलांना पकडून नेण्याचे सांगण्यात आले. हे सुडाचं राजकारण सरकारकडून केले जात असून सरकार हुकुमशाही करून दबाव निर्माण करत आहे.सरकारने गुंडाइझम, गुंडाराज उभा करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी देवांचा अपमान करण्याची कृती केलेली आहे. आम्हाला हे राम म्हणायला आवडतं. मात्र भाजप कायम महिलांचा अपमान करत राहिलेलं असल्याचा आरोपही पटोलेंनी केला.

# बुजुर्ग काकांचा पक्ष हिसकावणे सोप्प आहे पण...:निवडणूक आयोगाच्या निकाला वरुन मनसेचा अजित पवार यांना टोला

**मुंबई**–बुजुर्ग काकांनी उभा केलेला पक्ष दुसऱ्याच्या बळावर हिसकावणे सोप्प आहे पण बुजुर्ग नेत्याचा अवमान न करता स्वतःच्या बळावर स्वतःचा पक्ष उभा करण्यासाठी संघर्ष आणि संयम लागतो. हिंमत लागते, असा थेट हल्ला मनसेच्या ट्विटर हँडलवरून अजित पवार यांचे नाव न घेता करण्यात आला आहे.

विधिमंडळ पक्षातील बहुमताच्या आधारावर अजित पवार गट हाच मूळ 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष' असल्याचा निकाल मंगळवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिला. यासह राष्ट्रवादीचे 'घड्याळ' हे निवडणूक चिन्हही (पक्षचिन्ह) अजित पवार गटाला बहाल करण्यात आले. या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक आणि राष्ट्रीय नेते शरद पवार यांना मोठा राजकीय धक्का बसल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागू असे, शरद पवार गटाने म्हटले आहे.बुजुर्ग काकांनी उभा केलेला पक्ष दुसऱ्याच्या बळावर हिसकावणे सोप्प आहे पण बुजुर्ग नेत्याचा अवमान न करता स्वतःच्या बळावर स्वतःचा पक्ष उभा करणे, चिन्ह मिळवणे ह्यासाठी 'राज ठाकरे' यांच्यासारखा संघर्ष आणि

संयम लागतो, हिंमत लागते... असो, त्यांचे राजकारण त्यांना लखलाभ !, असा टोला मनसेने लगावला आहे.सुनावणी काळात दोन्ही गटांनी सादर केलेली प्रतिज्ञापत्रे आणि युक्तिवादानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षात अजित पवार गटाकडे बहुमत असल्याचा निष्कर्ष निवडणूक आयोगाने काढला. शिवसेनेबाबतही निवडणूक आयोगाने असाच निष्कर्ष काढला होता. त्यामुळे विधिमंडळातील बहुमताच्या आधारावर अजित पवार गट हाच मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा निर्वाळा आयोगाने दिला आहे.

# तेव्हा फुटलेल्या आमदारांची घरवापसी होईल भाजपचे आमदार सर्वाधिक नाराज- देशमुख

**नागपूर**–भाजपाचे आमदार सर्वात जास्त नाराज आहे. पुढील काळात अनेक आमदारांची घरवापसी होईल, असा विश्वास माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे आमदार अनिल देशमुख व्यक्त केला आहे. अदृश्य शक्तीचा वापर करून हे सर्व करण्यात आले आहे, अशी प्रतिक्रिया अनिल देशमुखांनी निवडणूक आयोगाच्या निकालावर दिली आहे.दरम्यान अनिल देशमुख पुढे बोलताना म्हणाले की, फडणवीसांना माहिती आहे की हे सगळे का झाले, कसे झाले, कुठून झाले आणि कोणी केले. काही अदृष्य शक्तींचा वापर करून हे सगळे केले गेले आहे, हे सर्वांना माहिती आहे. उगाच काहीतरी सांगायचे, लोकांच्या समोर आपली बाजू मांडायची यासाठी ते काहीही वक्तव्ये करत आहेत. महाराष्ट्रातीला जतनेला सगळे काही माहिती आहे. शिवसेनेच्या बाबतीत जे काही झाले, काल राष्ट्रवादीच्या बाबतीत जे झाले त्याची जनतेला कल्पना आहे. महाराष्ट्रातील जनता हे सगळे

घडवणाऱ्यांना योग्य वेळी शिक्षा केल्याशिवाय राहणार नाही.सर्व ठरलेल्या प्रमाणे सूड बुद्धीचे राजकारण सुरू आहे आधी ठाकरे ची शिवसेना शिंदे यांना दिली. आता आमचा पक्ष अजित पवार यांना दिला. पण सर्वांना माहीत आहे की, पक्ष कोणी स्थापन केला. आमचा पक्ष शरद पवार आहेत आणि आमचे निवडणूक चिन्हही शरद पवारच आहेत. निवडणूक आयोगाने दिलेला हा निर्णय सूड बुद्धीने दिला आहे. आज शरद पवार आज चिन्हाबाबत निर्णय घेतील, असे अनिल देखमुख म्हणाले आहेत.अनिल देशमुख म्हणाले की, मतदारसंघात विकासकामे करण्यासाठी सरकारच्या माध्यमातून निधी हवा असतो. पैसे हवे असतात. त्यामुळे अनेक आमदार महायुतीत सहभागी झाले आहेत. परंतु, निवडणुका जवळ आल्यावर त्यातल्या बहुसंख्य आमदारांची एकेक करून घरवापसी सुरू होईल. अनेक आमदार आमच्या संपर्कात आहेत. वेळ आल्यावर हे आमदार शरद पवार यांच्याकडे परत येतील. अनेक आमदार शरद पवार आणि जयंत पाटील यांना भेटून गेले आहेत. त्यामुळे आगामी काळात निवडणुकांच्या आधी फुटलेले आमदार परत येतील.

# १९७७ ची चूक यावेळी होऊ नये प्रकाश आंबेडकरांचा 'मविआ'ला इशारा

**नागपूर**–१९७७ मध्ये महाराष्ट्रात पुरोगामी लोकशाही दल अर्थात पुलोदचा प्रयोग झाला. त्यावेळेचे सरकार स्थापनेनंतर किमान समान कार्यक्रमावर मतभेद झाल्यामुळे कोसळले. १९७७ ची चूक या वेळेस होऊ नये म्हणून आम्ही महाविकास आघाडीला ३१ मुद्द्यांचा मसुदा दिल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी येथे प्रसार माध्यम प्रतिनिधींशी बोलताना दिली.

महाराष्ट्रात १९७७ मध्ये पहिल्यांदाच बिगर काँग्रेसी सरकार आले होते. यात शरद पवारांची समाजवादी काँग्रेस, जनता पक्ष, शेकाप आणि कम्युनिस्ट पक्ष सहभागी झाले होते. मात्र या सरकारजवळ स्थापनेपूर्वी किमान समान कार्यक्रम नव्हता. आणि नंतर तो ठरवण्यावरून झालेल्या मतभेदांमुळे हे सरकार कोसळले होते, असे प्रकाश आंबेडकर यांनी मविआला इशारा देत म्हटले आहे.सद्यस्थितीत कमीतकमी अंडरस्टँडिंग कशावर होऊ शकते हे पाहावे लागेल. १९७७ मध्ये झालेली एकजूट किमान समान कार्यक्रमावरील मतभेदांमुळे फुटली. यावेळेस त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आम्ही मुद्दे दिलेले आहेत. त्यावर किमान एकमत व्हावे आणि त्याची माहिती महाविकास आघाडीतील घटक पक्षांना असावी. त्यावर अंडरस्टॅण्डींग झाले की, दुसऱ्या टप्प्यात जागा वाटपावर चर्चा होईल, असे प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी स्पष्ट केले.१ लाख २० हजार ५०२ कोटींचे विदेशी चलन कापसातून मिळते. तर ७ लाख प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रोजगार वस्त्रोद्योग मंत्रालयातून मिळतो. मात्र कापूस व कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. परिणामी दिवसेंदिवस कापसाचे क्षेत्र कमी होत आहे. शेतकरी इतर पर्यायी पिकांकडे वळत आहेत. आम्ही सत्तेवर आल्यास कापसाला पूर्वी प्रमाणे ५०० रूपये प्रति क्विंटल बोनस देऊ, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.आज कापूस वेचायला माणसे मिळत नाही. म्हणून कापुस वेचणाऱ्यांना इजीएस निधीतून एका किलोमागे ५रूपये सरकारकडून पुरवणी मजूरी देऊ. राज्यातील इजीएस निधी वर्षाला ३२ हजार कोटी जमा होतो. कापुस वेचणाऱ्याची नोंद बीडीओकडे केल्या जाईल. आम्ही सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न प्राधान्याने सोडवू, अशी हमीही प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी दिली.

# सगेसोयरे कायदा मंजूर होणारच; जरांगेंचा विश्वास:१० फेब्रुवारी पासून पुन्हा उपोषण करणार

**मुंबई**–मराठ्यांच्या जीवावर मोठे झालात आणि मराठ्यांच्याच आरक्षणाला विरोध करता, बस झालं, आता यापुढे तुम्हाला आमच्या जीवावर मोठं होऊ देणार नाही. मी जिवंत असेपर्यंत मराठ्यांच्या जिवावर कोणालाच मोठं होऊ देणार नाही. जे आमच्या बाजूने बोलतात. आमच्या गोरगरीब लेकरांच्या कल्याणाचा विचार करतात, त्यांचाच आम्ही देखील विचार करू, असा घणाघात मनोज जरांगे यांनी विरोधकांवर केला. तर कामोठे या ठिकाणी मुंबई डबेवाले असोसिएशनच्या वतीने जरांगे यांना पाठिंबा देण्यात आला.जरांगे यावेळी बोलताना म्हणाले की, विरोधकांना मी एकटाच काफी आहे, त्यांना मी पुरून उरेल, जो माझ्याविरुद्ध बोलतो त्याच्यात दम असेल तर त्यांनी समोर येऊन दाखवावं, त्याला पुरून उरेल. मला त्याच्या किती दम आहे, हेच पाहायचं आहे, असे म्हणत त्यांनी छगन भुजबळ यांचे नाव न घेता त्यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली. तर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मी १० फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषणाला बसणार आहे, असे ते म्हणाले.

# केंद्रातील महाशक्तीच्या बेलगाम सत्तेचा गैरवापर:जखमी वाघ घातक असतो, फुटीर गटाने लक्षात ठेवावे-रोहित पवार

**मुंबई**–राष्ट्रवादी शरद पवार गटाला सर्वात मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादीचे घड्याळ पक्ष, चिन्ह अजित पवार गटाला मिळाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवारांचा की शरद पवारांचा यावर निवडणूक आयोगामध्ये सुनावणी झाली.शिवसेना फुटीनंतर राष्ट्रवादीतील या फुटीप्रकरणी घेतलेल्या निर्णयावरून विरोधकांनी हल्लाबोल केला आहे. तसेच, शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनीही टीका केली आहे.रोहित पवार म्हणाले की, केंद्रातील महाशक्तीच्या बेलगाम सत्तेचा गैरवापर करून फुटीर गट व्यक्तीगत स्वार्थासाठी पक्ष बळकावण्याचा असंवैधानिक निर्णय घेऊ शकतो. परंतु आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर वाढवणे, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणे, मंबईचे महत्त्व अबाधित राखण्यासाठी प्रयत्न करणे, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे, राज्यातील हक्काचे प्रकल्प राज्यातच टिकवून ठेवणे. असे महाराष्ट्राच्या हिताचे कायदेशीर निर्णय केंद्रातील महाशक्तीचा वापर करुन सामान्य लोकांच्या हितासाठी मात्र त्यांना घेता येत नाहीत, यातच त्यांची लायकी कळते. आज सत्तेचा गैरवापर करुन पक्ष आणि चिन्ह जरी बळकावले असले तरी पक्षाचा बाप आमच्यासोबत आहे.रोहित पवार म्हणाले की, फुटीर गट आणि भाजप महाराष्ट्रकडे निवडणूक आयोगाकडून निर्णय आपल्याकडे करुण घेण्याची ताकद असेल तर धनगर, मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्याची धमक नाही का असा सवाल रो हित पवारांनी केला आहे. तर महाशक्तीचा वापर केवळ स्वहितासाठी करुण घेता म्हणत सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल केला आहे.रोहित पवार म्हणाले की, निवडणूक आयोग ही राजकीय विंग असल्याचे म्हणत रोहित पवार यांनी केंद्र सरकार यांच्यासह निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला आहे. जखमी वाघ हा एकदम घातक असतो हे फुटीरा गटासह भाजपने लक्षात घ्यायला हवे असा टोलाही त्यांनी लगावला

आहे.रोहित पवार म्हणाले की, इलेक्शन कमिशनच्या प्रमुखाच्या नियुक्तीचा अधिकार पूर्णपणे सत्तेतील लोकांचा आहे.त्यामुळे कालच्या निकालावर काय बोलणार असंविधानिक पद्धतीने फुटीर गटाला पार्टी आणि चिन्ह जरी दिले असल तरी, ज्या माणसाने पार्टी सुरू केली तो बाप माणूस आमच्याकडे आहे. शेवटी २००० साली जेव्हा राष्ट्रवादी पार्टीचे निर्माण झाले होते. तेव्हा कुणालाही आमचे चिन्ह माहीत नव्हते. सगळ्यांना पवार साहेब कोण आहेत, पवार साहेबांनी काय केलंय हे माहीत होतं. ज्यामुळेच हे फुटीरगटातले नेते निवडून आले. त्यामुळे आमचा विश्वास हा साहेबांवर, साहेबांच्या कार्यावर आणि महाराष्ट्राच्या जनतेवर आहे असे रोहित पवार म्हणालेत्यामुळे आम्हाला भीती नाही. भाजपकडे पक्ष फोडण्याची ताकद असेल तर धनगर, लिंगायत आणि इतर समाजाला ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण देण्याची धमक त्यांच्याकडे नाही का?शेतकऱ्यांना न्याय देण्याची धमक, गुजरातमध्ये जात असलेल्या उद्योगांना थांबवण्याची धमक या भाजपमध्ये नाही का? येत्या काळात पक्ष मजबूतीसाठी राज्यभर दौरा केला जाणार असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. येत्या काळात लढेंगे भी और जितेंगे भी. ज्या व्यक्तीने पक्ष सोडला, घर सोडले त्यावर मी बोलू इच्छित नाही. येत्या काळात लोकांच्या मनातील पक्षाचे नाव आणि चिन्ह लवकरच देऊ. असे रोहित पवार म्हणाले.केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्हाबाबत अजित पवार गटाच्या बाजूने निकाल दिला आहे. राष्ट्रवादीचे घड्याळ पक्ष, चिन्ह अजित पवार गटाला मिळाले आहे. याच पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया येत आहेत.याच पार्श्वभूमीवर आता रोहित पवार यांनी एक फोटो ट्विट केला आहे. या फोटोमध्ये उद्धव ठाकरे आणि शरद पवार दिसत आहेत. हा फोटो ट्विट करत त्यांनी जखमी वाघ अधिक धोकादायक असतो...! असं लिहिले आहे.

# शेतकऱ्यांच्या मुलांनी आपली दिशा बदलली तरच दशा बदलेल

**चिमूर । प्रतिनिधी**

**शेषराव संतोषराव राऊत**

रिकामे डोके सैतानाचे घर असते. त्यातही हाताला काम नसेल , खिशात पैसा नसेल , गावात इज्जत नसेल आणि लग्न होत नसेल, तर अशी मुले गुन्हेगारी क्षेत्राकडे वळायला वेळ लागत नाही . आज शेतकऱ्यांच्या बहुतांशी मुलांची अवस्था अशीच आहे. कष्ट करून शरीराला काहीच होत नाही, पण मानसिक त्रास सुरू झाला, तर कितीही कसलेले शरीर असले तरी ते खंगल्याशिवाय राहत नाही . शरीराने भक्कम असलेली माणसे मानसिक ताण सहन न झाल्यामुळे व्यसनी होत आहेत.

जे पिकवले जातेय ते घर प्रपंचाला पुरत नाही. मुलांचे शिक्षण, त्यांची लग्ने, यासाठी कर्ज काढायची वेळ येते . ते वेळेवर फिटले नाही तर आहे ते शेत विकायची वेळ येते आणि हा अपमान सहन होत नसेल तर शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. याला येणारी सरकारे जबाबदार असून कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी गेल्या सत्तर वर्षात शेतकऱ्यांच्या या अवस्थेत बदल झालेला नाही, कदाचित पुढेही होईल अशी आशा नाही. याला उपाय म्हणजे शेतकऱ्यांच्या मुलांनी आपली दिशा बदलली पाहिजे.पूर्णपणे शेतीवर अवलंबून राहणे येथून पुढे मूर्खपणा ठरणार आहे .आपली कष्टकऱ्यांची जात आहे, त्यामुळे कष्ट करायला लाजू नका , शेती पूरक व्यवसाय किंवा छोटा-मोठा कोणताही व्यवसाय सुरु करा. आपला स्वतःचा खर्च स्वतः भागवायला शिका , त्याचा भार आई-वडिलांच्या डोक्यावरून कमी करा . गरजा कमी करा , दिखावा कमी करा ,_जग काय म्हणेल या प्रश्नाला कायमची तिलांजली द्या . कोणताच व्यवसाय करायला लाजू नका किंवा कमीपणा मानू नका. आज तीनशे एकर जमीन असणारी माणसे भिकारी झालेली आहेत आणि शेतकऱ्याकडूनच भाजीपाला विकत घेऊन रस्त्यावर विकणारी माणसे चार चाकी गाडीत फिरताहेत . शेतकऱ्यांच्या मुलांनी पिकविलेला माल स्वतः विकायला शिका , मधले व्यापारी, दलाल यांची साखळी स्वतः तोडा . जोपर्यंत शेतकऱ्यांची मुले व्यापार हातात घेत नाहीत, तोपर्यंत शेतकऱ्यांचे दिवस कोणत्याच कायद्याने बदलणार नाहीत.प्रत्येक शेतकऱ्याच्या मुलाने शेती व्यतिरिक्त किमान शंभर रुपये तरी बाहेर कमवून घरात आणले पाहिजेत, तरच आपले घर आणि मानसन्मान टिकणार आहे .शहरातील लोक आज शेतकऱ्यांना मदत करायला सर्वजण तयार आहेत . त्यांनाही व्यापारी आणि मधले दलाल लुटत आहेत , त्यामुळे नोकरी निमित्त शहरात गेलेला आपला बांधव आपल्या स्वागतासाठी तयार आहे. फक्त आपण त्याच्या दारात जाणे गरजेचे आहे.या जीवनात स्वावलंबनासारखी दुसरी श्रीमंती नाही. शेतकऱ्यांनी आपल्या मुलांना शाळा-कॉलेज बरोबरच स्वावलंबन शिकवावे. यात बदल झाला नाही तर आपली मुले कोणत्याही पक्षाचे फुकट राबणारे कार्यकर्ते बनतील किंवा परिस्थितीमुळे गुन्हेगारही बनतील. कारण शासन आणि प्रशासन गेंड्याच्या कातडीचे आहे . त्यांच्याकडून कोणत्याही अपेक्षा कोणाकडूनही पूर्ण होणार नाहीत.हे वास्तव स्वीकारून शेतकऱ्याच्या मुलांनी पक्षाचे झेंडे फेकून दिले पाहिजे. व शेतकऱ्यांनी आणि शेतकऱ्यांच्या मुलांनी आपली दिशा बदलली पाहिजे .आपण दिशा बदलली तर आपली दशा बदलायला वेळ लागणार नाही. सरकार सोडले तर सर्व समाज शेतकऱ्यांबरोबर आहे याच्यावर विश्वास ठेवा आपण बळी राजे आहोत , हे राजेपण टिकवणे आपल्याच हातात आहे. आपण स्वतःत बदल नाही केला, तर आपण फक्त बळी द्यायचे राजे ठरू हे मात्र निश्चित.

# भद्रावती येथे विवेकानंद जयंती साजरी

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. बंडू जांभूळकर होते. यावेळी मंचावर भद्रावती शहरातील सामाजिक कार्यकर्ते प्रा. धनराज आस्वले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. विजय टोंगे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी जीवनात शिस्त पाळली पाहिजे. महापुरुष होणे सोपे नाही त्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले पाहिजे असा संदेश दिला. या कार्यक्रमात हुशार विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ नामदेव उमाटे, सूत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. नरेंद्र लांबट यांनी केले. यावेळी, पालक , महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक तथा शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १४ फेब्रुवारी रोजी 'लिडकॉम आपल्या दारी' कार्यशाळेचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत शासन आपल्या दारी या संकल्पनेतर्गत 'लिडकॉम आपल्या दारी' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. सदर कार्यशाळा बुधवार, दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन सभागृह, रय्यतवारी रोड, चंद्रपूर येथे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

चर्मकार समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी ही कार्यशाळा असून या माध्यमातून चर्मकार बांधवांना महामंडळाच्या योजनांची माहिती देवून इच्छुक उमेदवारांकडून फार्म भरुन घेतले जाणार आहेत. महाराष्ट्रामध्ये एम.सी.ई.डी.मार्फत २५ हजार युवक-युवतींना निवासी व अनिवासी प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्याकरीता चर्मकार प्रवर्गातील युवक-युवतींची नोंदणी करण्यात येणार आहे.तरी, जिल्ह्यातील युवक-युवतींनी व चर्मकार बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन कार्यशाळेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक कल्पना भंगाळे यांनी केले आहे.

# एकलव्य शाळेच्या पुढाकाराने सर्वगुण संपन्न विद्यार्थी घडतील - डॉ.अनिल चिताडे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सृष्टी बहुउद्देशीय संस्था, गडचांदूर द्वारा संचालित एकलव्य इंग्लिश स्कूल नांदाफाटा या शाळेचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. उपक्रमशील शाळा असल्याने एकलव्य शाळेच्या पुढाकाराने सर्वगुण संपन्न विद्यार्थी घडतील असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनी केले.

रविवारी एकलव्य शाळेत आयोजित बालदृष्टी - २०२४ या सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिल पोडे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी विद्यालय व उच्च महाविद्यालयाच्या प्राचार्या स्मिता चिताडे, संस्थेचे उपाध्यक्ष अनिल उरकुडे, सचिव प्रा.आशिष देरकर, कोषाध्यक्ष सचिन आस्वले, सदस्या पौर्णिमा पोडे, शाळेच्या व्यवस्थापक स्वाती देरकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत मसे, मुख्याध्यापक नितेश शेंडे उपस्थित होते.यावेळी संस्थेच्या वतीने राज्य शासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित महात्मा गांधी विद्यालयाच्या प्राचार्या स्मिता चिताडे यांचा सत्कार करण्यात आला. दरवर्षी देण्यात येणाऱ्या शाळेतील सर्वोत्कृष्ठ विद्यार्थी पुरस्कार यावेळी आठव्या वर्गातील विद्यार्थिनी रितिका पंडित पवार हिला सर्व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. सोबत शाळेतील अंतर्गत खेळ, सांस्कृतिक, विज्ञान अशा विविध उपक्रमात उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण व रौप्य पदक देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमामध्ये नर्सरी ते दहाव्या वर्गातील विद्यार्थ्यांनी एकापेक्षा सरस नृत्य सादर करीत उपस्थित पालक व प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नितेश शेंडे यांनी केले. संचालन पूजा बर्मन व प्रिया चौधरी यांनी तर आभार रेवती लांडे यांनी मानले. कार्यक्रमाला पालक व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

Cultural Celebration - 2024
Date ... b. 2024

# तुळजापूर संस्थानचा लेखाधिकारी ६ लाखांची लाच घेताना अटकेत

**तुळजापूर**-तुळजाभवानी मंदिर संस्थानचे वित्त व लेखाधिकारी सिद्धेश्वर शिंदे यांना सुमारे एक लाख रुपये पगार असतानाही ६ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत विभागाने रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयातील स्वतःच्या केबिनमध्ये बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. ३ कोटी ८८ लाखांच्या कामापैकी थकलेले १ कोटी ८८ लाखांचे बिल मंजुरीसाठी शिंदे याने १० लाख रुपये मागितले होते.तुळजाभवानी मंदिर संस्थान संचालित तुळजाभवानी सैनिक विद्यालयाच्या प्रशासकीय इमारत तसेच संरक्षक भिंतीच्या कामाचे देयक काढण्यासाठी १० लाख रुपये लाचेची लेखाधिकारी शिंदे यांनी मागणी केली होती.तडजोडीनंतर ६ लाख रुपये पंचासमक्ष स्वीकारताना लाचलुचपत विभागाने शिंदे यांना ताब्यात घेतले. लाचलुचपत विभागाचे छत्रपती संभाजीनगर विभागाचे पोलिस अधीक्षक मुकुंद आघाव यांचा मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार दिनकर उगलमुगले, सचिन शेवाळे, आशिष पाटील यांनी कारवाई केली.तुळजाभवानी सैनिक विद्यालयाचा प्रशासकीय इमारत, कंपाउंड वॉल, प्रवेशद्वार तसेच प्रतीक्षा कक्ष आदी कामांचे ३ कोटी ८८ लाख रुपयांचे कंत्राट सोलापूर येथील एस. एस. बिराजदार यांना मिळाले आहे. या कामाचे आतापर्यंत २ कोटी रुपयांपेक्षा अधिकचे बिल तपासणी करून मंजुरीसाठी पाठवून दिले होते. उर्वरित १ कोटी ८८ लाखांचे बिल तपासणी करून मंजुरीसाठी पाठवण्याकरिता तसेच अतिरिक्त सुरक्षा रक्कम म्हणून भरलेले ३४ लाख ६० हजार ५७९ रुपये परत मिळवून देण्यासाठी ६ लाखांची लाच स्वीकारण्यात आली.

# आदिवासी उमेदवारांकरीता स्पर्धा परिक्षेच्या तयारीबाबत प्रशिक्षण सत्र

## २२ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वर्ग ३ व ४ पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षेची आदिवासी उमेदवारांकडून तयारी करून घेण्याकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राच्या वतीने साडेतीन महिन्यांचे स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले आहे.

१ एप्रिल ते १५ जुलै २०२४ या कालावधीत होणाऱ्या प्रशिक्षण सत्राकरीता अनुसूचित जमातीतील आदिवासी उमेदवारांनी २२ मार्च २०२४ पर्यंत कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय भवन, पहिला माळा, हॉल क्र. १९, चंद्रपूर येथे अर्ज सादर करावे, असे आवाहन रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी भाग्यश्री वाघमारे यांनी केले आहे.प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना दरमहा १ हजार रुपये विद्यावेतन देय राहील. अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) प्रवर्गातील आदिवासी उमेदवारांनी सदर अर्जामध्ये स्वत:चे संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, जन्मतारीख, शैक्षणिक पात्रता, प्रवर्ग (जात) तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र चंद्रपूर यांचा नोंदणी क्रमांक आदींचा उल्लेख करावा. अर्ज करण्याकरीता एम्प्लॉयमेंट कार्ड असणे आवश्यक आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २२ मार्च २०२४ असून २७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता मुलाखत आयोजित करण्यात आली आहे. निवड यादी दुसऱ्या दिवशी सायंकाळी प्रसिध्द करण्यात येईल.प्रशिक्षणाच्या अटी : उमेदवार अनुसूचित जमाती (एस.टी.) (आदिवासी) प्रवर्गातील असावा. उमेदवाराचे किमान वय १८ ते ३८ दरम्यानचे असावे. उमेदवार किमान एच.एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण असावा. उमेदवाराचे नाव जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर येथे नोंदणी केलेले असावे.आवश्यक कागदपत्रे : शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्र, गुणपत्रिका (एस.एस.सी / एच.एस.एस.सी / पदवी), आधारकार्ड, जिल्हा कौशल्य विकास विभागाचे नोंदणी कार्ड.

# सार्वजनिक महिला समाजाच्या वतीने माजी सैनिकांचा सत्कार

**वणी । प्रतिनिधी**

येथील सार्वजनिक महिला समाजातर्फे भारतीय सीमेवर राहून देशाचे रक्षण करणाऱ्या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. समाजाच्या अध्यक्ष शालिनी गंगशेट्टीवार यांची ही संकल्पना होती. राष्ट्रप्रेम आणि सर्वधर्म समभाव वाढविण्यासाठी हा आगळावेगळा कार्यक्रम घेण्यात आला. माजी सैनिकांचे अनुभव ऐकून सर्व महिला भारावून गेल्यात. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी अध्यक्षा नीलिमा काळे या होत्या.

निमंत्रित माजी सैनिक मधुकर धगडी, विश्वेश्वर चवने, नामदेव शेळके, श्री ऋषी गाताडे, भडगरे, नीलेश इनमुलवार, कुकडे, ज्ञानेश्वर मोहिते, बंडू वाढई, शेख मेहमूद, रफिक भाई उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन स्नेहलता चुंबळे यांनी केले. यावेळी त्यांनी स्वरचित स्वागतगीत म्हटले. स्मिता गोरंटीवार यांनी सैनिकांकरिता कविता सादर केली. सपना पावडे यांनी सैनिकांबद्दल मनोगत व्यक्त केले. नीलिमा काळे यांनी अध्यक्षीय भाषण करून ये मेरे वतन के लोगो हे देशभक्ती गीत गायले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सर्व कार्यकारिणी व महिला सदस्य उपस्थीत होत्या. सपना पावडे यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कुष्ठरोग व क्षयरोग बाबत रॅलीद्वारे जनजागृती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

३० जानेवारी हा दिवस कुष्ठरोग निवारण दिन म्हणून साजरा केला जातो. समाजामध्ये कुष्ठरोग बाबत जनजागृती व्हावी या दृष्टीने दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या पंधरवाड्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.बल्लारपूर शहरात महात्मा ज्योतिराव फुले महाविद्यालय, तालुका आरोग्य अधिकारी आणि ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच शिक्षकांच्या सहाय्याने कुष्ठरोग व क्षयरोगाबाबत जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कलंक कुष्ठरोगाला मिटवुया, सन्मानाने स्वीकार करूया असे घोषवाक्य देत कुष्ठरोगाबाबत तसेच राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत टी.बी. हारेगा, देश जितेगा असे घोषवाक्य देत शहरात प्रभात फेरी काढून क्षयरोगाबाबत जनजागृती करण्यात आली.सदर जनजागृती अभियानात महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक तसेच बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयाचे सर्व कर्मचारी सहभागी झाले होते.

# १२ व १३ फेब्रुवारी रोजी पंडित दिनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडल करीअर सेंटर चंद्रपूरच्या संयुक्त विद्यमाने दि. १२ व १३ फेब्रुवारी २०२४ रोजी पंडित दिनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

इच्छुक उमेदवारांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या वेबपोर्टलवर स्वतःची नाव नोंदणी करून किंवा ज्यांनी यापूर्वी नाव नोंदणी केलेली असेल त्या उमेदवारांनी अप्लाय करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी येरमे यांनी केले आहे.

ऑनलाईन नोंदणी करण्याची कार्यपद्धती :www. mahaswayam. gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा प्ले-स्टोअर मधुन महास्वयंम अप्लीकेशन मोफत डाऊनलोड करुन इन्स्टॉल करा व एम्प्लॉयमेंटवर क्लिक करा. एम्प्लॉयमेंट पृष्ठावरील जॉब सिकर हा पर्याय निवडून नोंदणी, आधार कार्ड क्रमांक व पासवर्डने साइन इन करा. नंतर होम पेजवरील पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन जॉब फेअर चंद्रपूर-५ हा पर्याय निवडा. चंद्रपूर जिल्ह्याची निवड करुन फिल्टर बटनावर क्लिक करा. क्लिक केल्यानंतर रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या ओळीतील ॲक्शन मेनुतील दुसऱ्या बटणावर (व्हॅकन्सी लिस्टिंग) क्लिक करा. आयॲग्री हा पर्याय निवडा.पर्याय निवडल्यानंतर शैक्षणिक पात्रतेनुसार जुळणारे विविध आस्थापना, कंपन्यांच्या रिक्त पदांच्या अप्लाय बटनावर क्लिक करा.सर्व बेरोजगार उमेदवारांनी आपल्या युजर आयडी व पासवर्डने लॉगीन करुन दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी वेबपोर्टलवर नोंद केलेल्या उद्योजकांच्या रिक्त पदांकरीता उद्योजकांनी नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अप्लाय करावे आणि उद्योजकांसोबत व्हॉट्सपच्या माध्यमातुन संपर्क साधुन ऑनलाईन मुलाखत द्यावी व ऑनलाईन रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी येरमे यांनी केले आहे.

# सोळू येथे भीषण आग गुरांचा चारा दुचाकी चार चाकी वाहने यांचे नुकसान

**आळंदी** -जवळील सोळु येथील प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला भीषण आग लागली. हि आग ट्रान्सफॉर्मर चा स्पोट झाल्यामुळे लागल्याचे निष्पन्न झालेले आहे. या आगीची झळ आजूबाजूच्या गावांना पोहचली असून आजूबाजूच्या गावांचे ही नुकसान झाले.सदरची कंपनी सुमारे चार वर्षापासून बंद अवस्थेत होती या स्पोटा मुळे मोठ्या प्रमाणात आगीचे लोट आणि ठिणगी उडाल्यामुळे आजूबाजूंच्या उभ्या असलेल्या वाहने तसेच गुरांचा चारा ची गंजी, आणि जनावरे, गुर ढोरे, यांना हानी झाल्याचे समजते.तात्काळ मदत मिळाल्यामुळे आजूबाजूच्या घरांना हानी होण्यापासून वाचवण्यात यश आले आहे, यासाठी आळंदी नगर परिषदेची अग्निशामक दल वाहन सर्वप्रथम येथे पोहोचून मदत कार्य सुरू केले,त्याचबरोबर पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील तसेच पुणे महानगरपालिका येथील अग्निशामक दलाच्या वाहनांनी तात्काळ जागेवर धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.सुमारे १०० मीटर पर्यंत या आगी ने परिसर व्यापला.आणि दुकाने पत्रा शेड आजूबाजूच्या परिसराला मोठ्या प्रमाणात हानी पोहोचलेचे समजते.सुमारे ५ वाजून ९ मिनिटांनी आग लागली.सुमारें आठ जण जखमी झाल्याचे वृत्त आहे जखमींना तात्काळ ससून रुग्णालयामध्ये पुढील वैद्यकीय उपचारासाठी हलवण्यात आलेले आहे याबाबत आळंदी पोलीस विशेष तपास करत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .